**प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांच्या प्रस्तावित ताराळी नदीवर डांगिष्टेवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथे ताराळी पंप स्टोरेज हायड्रो प्रकल्प (ताराळी पीएसएचपी) ) १,५००.० मेगावॅट (४ X ३०० मेगावॅट + २ X १५० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांच्या प्रस्तावित ताराळी नदीवर डांगिष्टेवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथे ताराळी पंप स्टोरेज हायड्रो प्रकल्प (ताराळी पीएसएचपी) ) १,५०० मेगावॅट (४ X ३०० मेगावॅट + २ X १५० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता गट क्रमांक २६५, ३७६, ३८९, गगनगिरी महाराज मठ, मुक्काम पोस्ट - कळंबे, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र, येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. अमोल आ. सातपुते, आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी मा. श्री. नागेश पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा तसेच श्री. प्रशांत गायकवाड सदस्य-पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी, तथा उप प्रादेशिक अधिकारी, पुणे. प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या

दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल), अदानी कॉर्पोरेट हाऊस, शांतीग्राम, वैष्णोदेवी सर्कलजवळ, एस.जी. महामार्ग, खोडीयार, अहमदाबाद ३८२ ४२१, राज्य-गुजरात यांचा त्यांच्या प्रस्तावित ताराळी नदीवर डांगिष्टेवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा, महाराष्ट्र राज्य येथे ताराळी पंप स्टोरेज हायड्रो प्रकल्प (ताराळी पीएसएचपी) ) १,५०० मेगावॅट (४ X ३०० मेगावॅट + २ X १५० मेगावॅट) उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०८/०१/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचना २००९ नुसार संवर्ग ए १ ( सी ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय आघात/परिणामाची माहिती करून देणे व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अ सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ०९/११/२०२२ रोजी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदरची पर्यावरणविषयक जनसुनावणी मंगळवार दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत

सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १२१/२०२४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२४०२१६ एफटीएस ०२४६ दिनांक -१६-०२-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

त्यानुसार सुनावणीस खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. श्री. नागेश पाटील, , - **अध्यक्ष**
निवासी उप जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

२) श्री. प्रशांत गायकवाड , - **सदस्य**
सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती,
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी
तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.

३) श्री. अमोल आ. सातपुते, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०७-०२-२०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिरात प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा.
२. जिल्हा उदयोग केंद्र , सातारा
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सातारा

४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय) कल्पतरु पॉईंट , ३ रा व ४ था मजला, सायन माटुंगा, स्किम रोड क्र ८ , सायन सर्कल समोर, सायन (पूर्व) , मुंबई § ४०००२२ .

५. प्रादेशिक अधिकारी , म. प्र. नि. मंडळ , जोग सेंटर, ३ रा मजला , वाकडेवाडी, जुना पुणे § मुंबई रोड पुणे ४११ ००३

६. क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीयल बिल्डींग , तळमजला इस्ट विंग, सिव्हील लाईन नागपूर .

७. पर्यावरण विभाग, नविन प्रशासकीय भवन १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई- ३२

८. उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नविन प्रशासकीय इमारत २ रा मजला एसटी स्टँडच्या पाठीमागे , सदरबझार सातारा

९. उप विभागीय अधिकारी, उप विभाग-पाटण, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,

१०. तहसीलदार, तहसील कार्यालय-पाटण, तालुका- पाटण, जिल्हा-सातारा,

११. ग्रामपंचायत कार्यालय डांगिस्तेवाडी / कळंबे, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा,

आयोजक यांनी आजपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांचेकडे लेखी सूचना प्राप्त झाले असल्याचे सांगीतले. तथापि आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास प्रकल्प सादरीकरणानंतर तसे मांडण्यात याव्यात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. सदरहू इतिवृत्त त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने व स्वाक्षरीने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती

त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वाचे स्वागत करुन सांगितले की जनसुनावणीचा उद्देश व कार्यकक्षा ही आयोजक यांनी बैठकीच्या सुरवातीसच सांगितलेली आहे. या जनसुनावणीचा मुळ उद्देश प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात जे संभाव्य पर्यावरणीय आघात होतील, त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकामार्फत माहिती देणे व त्यावर उपसिथतांच्या सूचना, विचार, टीकाटिप्पणी, आक्षेप इ. इतिवृत्तात नोंद घेवून ते शासनास कळविणे हा आहे. तरी सुरूवातीस प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात येईल. ते आपण शांततेने ऐकून घ्यावे, त्यानंतर उपस्थित सर्वांना त्यांचे प्रश्न, विचार, टीकाटिप्पणी ,आक्षेप मांडण्याची संधि देण्यात येईल.

त्यावेळी श्री. प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी अध्यक्षांसमोर जाऊन विचारणा केली की सादरीकरणासाठी किती कालावधी लागेल? तो मर्यादित ठेवण्यात यावा. त्यांनी अध्यक्षांची परवानगी घेऊन सूचना केली की मूळात ईआयए अहवाल हा जो कंपनीकडून करण्यात आलेला आहे, तो बोगस आहे. आंध्र प्रदेशातील सर्व माहिती येथे फक्त कॉपी-पेस्ट केलेली आहे. चुकीच्या आधारावर हा अहवाल केलेला आहे. आंध्रप्रदेशातील माहितीवर बनविलेला आहे. तरी या चुकीच्या अहवालावर सादरीकरण करणे हे चुकीचे असून त्यामुळे स्थानिकांची दिशाभूल होईल. पानोपानी खोटी माहिती दाखविता येईल. आंध्र प्रदेशातील पेडीक्युलर धरणावर हा अहवालात दिलेला आहे. तसेच येथील जैववैविधता आहे, त्याचा काहीच अभ्यास केलेला नाही.

अध्यक्ष व सदस्य. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधितांना सूचना केली की प्रथम सादरीकरण पूर्ण होऊन द्यावे.

त्याचवेळी श्री. शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार, यांनी आक्षेप नोंदविला की जर शपथपत्र बोगस असेल, तर त्या बोगस शपथपत्रावर आपण कशी जनसुनावणी घेऊ शकता?

श्री. रौहन भाटे, ऑनररी वॉर्डन, सातारा जिल्हा (तिसरी व्यक्ती पिवळा शर्ट) - यांनी आक्षेप नोंदविला की कॉपी पेस्ट अहवाल आहे, ११.८ पॉईंट बघितला तर तेथे पूर्णपणे केरळचे वर्णन आहे.

उपस्थितांनी मागणी केली की सदरहू जनसुनावणी ही योग्य प्रकारे व्हावी. चुकीच्या अहवालावर जनसुनावणी घेणे हे योग्य नाही. यात स्थानिक अजूनही तांत्रिक मुद्द्यात गेलेले नाहीत. मूळतः चुकीचा अहवालावर जनतेची दिशाभूल करणे कितपत योग्य आहे?

त्यावेळी अध्यक्ष , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की आपला मुद्दा ग्राह्य आहे. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. अध्यक्ष व आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रथम सादरीकरण होऊन द्यावे, नंतर प्रत्येकाला संधी देण्यात येईल अशी सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण करण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणास सुरवात केली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाचा तपशील सांगताना माहिती दिली की उदंचन/स्टोरेज प्रकल्प हा एक विशेष प्रकारचा हायड्रो पॉवर प्रकल्प आहेत, ते सहसा वीज निर्मिती प्रकल्प आणि स्टोरेज प्रकल्प म्हणून देखील काम करतात. यामध्ये एक खालचा व वरचा जलाशय असतो. खालच्या जलाशयातून वरच्या जलशयात पाणी नेताना सौर आणि पवन उर्जा वापरली जाते आणि वरच्या जलाशयातून पाणी आणताना वीज निर्मिती केली जाते.

त्यावेळी काही उपस्थितांनी जनरेटरचा आवाज खूप येत असल्याने सादरीकरण ऐकू येत नाही अशी तक्रार केली. तर काहींनी स्क्रीनवर स्पष्टपणे दिसत नाही अशी तक्रार केली.

त्यानंतर पुढे प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की ताराळी उदंचन प्रकल्प विकसित करत असून या प्रकल्पात दोन जलाशयांचा समावेश आहे. ताराळी जलाशय आधीपासून अस्तित्वात असुन वरचा जलाशय बांधण्यात येणार आहे. येथे एकदरीत १५०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. प्रस्तावित योजनेमध्ये ११.३६ दशलक्ष घनमीटर साठवण क्षमता असलेला जलाशय बांधण्यासाठी ६१.५ मीटर उंच धरणाचे बांधकाम करण्यात येईल. हा एक ओपन शाफ्ट प्रकल्प आहे. प्रकल्प बांधकाम कालावधी अंदाजे ३६ महिने राहिल.

त्यावेळी उपस्थितांनी स्क्रीनवर स्पष्ट दिसत नसल्याने स्क्रीनवर पाहून वाचावे अशी सूचना केली. उपस्थितांनी सादरीकरण हे फक्त औपचारिकता म्हणून दाखवत आहेत असा आक्षेप नोंदविला. त्यांनी या आक्षेपाची इतिवृतात नोंद घेण्याची सूचना केली.

आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की एलईडी स्क्रीन असल्याने मागे स्पष्ट दिसत असेल. त्यावेळी सर्व उपस्थितांनी स्क्रीनवर स्पष्ट दिसत नसल्याचे सांगितले. याची इतिवृतात नोंद करण्याची उपस्थितांनी मागणी केली.

एडव्होकट श्री सिध्देश पवार, यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण सल्लागार जे वाचत आहेत, तेच स्क्रीनवर आहे असे सिध्द होत नाही, तर त्यांनी डायसवरुन खाली उतरुन स्क्रीनसमोर वाचावे, या मागणीची इतिवृतात नोंद घेण्याची सूयना केली. उपस्थितांनी आम्हांला न्यायालयात दाद मागताना याची नोंद आवश्यक असल्याची मागणी केली. त्यावेळी उपस्थितांनी तोंडी जे वाचत आहे ते वेगळे व स्क्रीनवर जे दाखवितात ते वेगळे आहे, तर येथील सामान्य नागरिकांना काय कळणार असा आक्षेप नोंदविला.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीच्या इतिवृतात या सर्व घटनांची नोद घेण्यात येईल असे सांगितले. अध्यक्ष यांनी सांगितले की सादरीकरण झाल्यानंतर आपणास पाहिजे तेवढा वेळ देणार आहोत, सर्वांच्या शंकांचे निरसन करण्यात येईल. तरी सादरीकरण पूर्ण करुन द्यावे.

त्यावेळी श्री एडव्होकट श्री सिध्देश पवार, यांनी आक्षेप नोंदविला की आमचा आक्षेप आहे की जे स्क्रीनवर दर्शवित आहेत, ते उपस्थितांना दिसत नाही. स्क्रीनवर डायग्रॅम दिसतो, तर सादरीकरण करणारी व्यक्ती हे दुसरेच बोलत आहे.

त्यावेळी अध्यक्ष यांनी सांगितले की सादरीकरणानंतर सर्व डायग्रॅम्स व त्याच्या प्रती ह्या अभ्यासासाठी स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

एडव्होकट श्री सिध्देश पवार, यांनी मागणी केली की उपस्थितांनी प्रकल्पाची माहिती ही स्क्रीनवर दिसत नाही, त्यामुळे प्रकल्पाची माहिती ही कळतच नाही असा आक्षेप नोंदविलेला असून त्याची नोंद इतिवृतात घेण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित आक्षेपाची इतिवृतात नोंद घेण्यात येत आहे असे सांगितले. त्यांनी पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण चालू करण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रस्तावित ताराळी पीएसपी ऑफ स्ट्रीम ओपन लूप प्रकल्प आहे. सध्याच्या खालच्या जलाशयाची साठवण क्षमता ही १६५.४ मिलियन क्युबिक मीटर आहे. तो जल संपदा विगागाने बांधलेला आहे. वरचा

जलाशय नविन बांधण्यात येऊन त्याची एकूण साठवण क्षमता १०.४२ मिलियन क्युबिक मीटर एवढी असेल.

त्यावेळी उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की पहिला जलाशय हा शेतीसाठी बांधलेला आहे. ताराळी धरणाचेच प्राणी आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये सांगितले की प्रकल्पात दाब शाफ्ट, टेल रेस बोगदा, हेट रेस बोगदास सर्ज शाफ्ट, पंप टर्बाईन आहे. प्रकल्पात वन जमिन नसून जंगलेतर जमीन ही १५०.७४५ हेक्टर एवढी आहे.

पर्यावरण सल्लागार हे सादरीकरण करत असताना उपस्थितांनी काय वाचत आहे, सादरीकरण हे कळत नाही असा आक्षेप नोंदविला.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व सूचना, आक्षेप हे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर ऐकण्यात येतील. सर्वांना सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि देण्यात येईल.

येथे उपस्थितांनी समुहाने उभे राहून मागणी केली की प्रत्येक मुद्यावर उत्तर देण्यात यावे, नंतरच पुढचा मुद्दा घेण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले बैठकीत पहिल्यांदाच बैठकीची रुपरेखा सांगण्यात आलेली आहे. त्यामुळे सादरीकरणानंतर एखादा मुद्दा परत घेता येईल. त्यावेळी उपस्थितांनी सामुहिकरित्या आक्षेप नोंदविला की ४० पानी सादरीकरण आहे. त्यामुळे शेवटपर्यंत पहिला मुद्दा लक्षात राहणार नाही. तरी प्रत्येक मुद्दा सादरीकरणात दर्शविल्यानंतर लगेच त्याबाबत प्रश्न उत्तरे घेण्यात यावीत. अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच रुपरेखा सांगितलेली आहे. त्यामुळे त्या बदल करता येणार नाही.

ग्रेथे श्री एडव्होकट श्री सिध्देश पवार, यांनी आक्षेप नोंदविला की स्क्रीनवर डायग्रॅम दाखविला, तर त्यावर स्थानिक काय बोलू शकतील?

त्यावेळी अध्यक्ष यांनी सर्वांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचा अधिकार दिलेला आहे असे सांगितले. सामुहिकपणे उपस्थितांनी मागणी केली की जर प्रत्येक मुद्दयावर चर्चा होणार नसेल तर ही जनसुनावणी बंद करण्यात यावी.

उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता सांगितले की प्रवेशव्दाराबाहेर ज्या स्वाक्ष-या घेण्यात ग्रेत आहेत, त्यावर आजच्या जनसुनावणीबाबतचा मजकूर लिहिलेला नाही. तो लिहिण्यात यावा.

उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता उपस्थितांना सांगितले की कृपया गोंधळ घालू नका. प्रत्येक मुद्दयावर चर्चा करण्यात येईल. आधी सादरीकरण होऊ द्या, आपण मुद्दे लिहून घ्यावेत, आपण ज्या मुद्द्यावर समाधानी नाहीत, ते परत विचारावेत. शांततेने घ्या. प्रकल्प सल्लागार यांनी प्रत्येक मुद्द्याचे स्पष्टीकरण करायचे आहे. जोपर्यंत आपणास समजत नाही, तोपर्यंत येथून उठू नका.

पर्यावरण सल्लागार प्रकल्प क्षेत्र विवरण सांगत असताना श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी आक्षेप नोंदविला की आता वनजमिन नाही असे सांगितले पण अहवालात वनजमिनीचे अधिग्रहण करण्यात येणार आहे असे नमूद केलेले आहे.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी वनजमिन आहे हे मान्य केले.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी मत मांडले की सरकारी जमिन पाहिजे, गायरान जमिन घेणार, पण त्याचा उल्लेख अहवालात करत नाहीत. पण येथे वनजमिन घेणार नाही म्हणून सांगत आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की वन जमिन लागणार नाही, तर जंगलेतर जमिन ही १५०.७४५ आहे, त्यात साईट ऑफिस व इतर घटक आहेत.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी आक्षेप नोंदविला की वनजमिन २०० हेक्टर अधिग्रहण करणार, गायरान जमिन साधारणतः १५० हेक्टर लागणार असा अहवालात उल्लेख आहे. सार्वजनिक जनसुनावणीत वनजमिन नाही म्हणत आहेत, पण अहवालात ते वनजमिन अधिग्रहित करणार असे नमूद केलेले आहे, असा आक्षेप नोंदविला.

श्री रोहन भाटे, ऑनररी वॉर्डन, सातारा जिल्हा यांनी सांगितले की प्रकल्पात ६८ हेक्टरपेक्षा जास्त वनजमिन जाणार आहे असा आरोप केला. उपस्थितांनी टीओआर पाहण्यास सांगितले.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पात वनजमिन नाही. मात्र गायरान जमिन आहे, ती १५० हेक्टरमध्येच आहे. प्रकल्पासाठी वनजमिन (forest land) नाही.

त्यावेळी श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी सांगितले की तुमच्या अहवालात त्याचा उल्लेख आहे अशी माहिती सांगितली.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की आपण लेखी द्या, आम्ही आपणास लेखी उत्तर देऊ. वनजमिन लागत नाही.

श्री रोहन भाटे, ऑनररी वॉर्डन, सातारा जिल्हा (तिसरी व्यक्ती, पिवळा शर्ट) यांनी सांगितले की forest submersion जाणार आहे. प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात सह्याद्री टायगर झोन व कोयना फॉरेस्ट झोन येतो.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ज्या काही लिगल गोष्टी लागतील, त्या करण्यात येतील. आमच्या कडे जिल्हा वन अधिकारी यांनी पत्र अदा केलेले आहे की प्रकल्पात वनजमिन नाही.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना जनसुनावणी पूर्वी ७/१२ नोंद होणे आवश्यक होते. आपण ते प्रथम करणे आवश्यक होते. ज्या काही लिगल गोष्टी लागतील, त्या प्रथम करण्यात याव्यात. या प्रकल्पात आध्र प्रदेशमधील ओढा आणि केरळमधील नदी अहवालात दिलेली आहे.

श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी परत आक्षेप नोंदविला की वचननामा/एफिडेविट बोगस आहे.

त्यावेळी उपस्थितांनी सामुहिकपणे कोणी हा कट पेस्ट अहवाला केला, त्यांना बोलविण्याची मागणी केली.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार ज्यांनी ईआयए केला त्यांनी सर्वांना सांगितले की हा ईआयए अहवाल मी तयार केलेला असून मी हिन्दीमध्ये आपणास उत्तर देऊ शकतो.

त्यांनी हिन्दीमध्ये उत्तर दिले की आम्हांला जिल्हा वन अधिकारी यांनी पत्र अदा केलेले आहे. आम्ही सांगतो की आम्ही शासकीय वनक्षेत्र घेतलेले नाही, वनविभागाची जमिन घेतलेली नाही. वन भूमी असू शकते. दोन प्रकारची जमिन आहे. एक सरकारी व दुसरी खाजगी. सरकारी भूखंडावर झाडे असू शकतात, पण तो भूखंड ही वनविभागाचा नसतो. अहवालात काही चुका असल्यास त्या दुरुस्त करण्यात येतील.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः-

काही कारणांमुळे डॉ माधव गाडगीळ,डॉ भारत पाटणकर येऊ शकले नाहीत. त्यांच्यावतीने लोहकरे, गावकर व मी प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना हे बोलतील.

अहवाल चुकीचा असून त्यावर होत असलेली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी हीच बेकायदेशीर आहे. तरी आजची जनसुनावणी ही रद्द करावी, अहवाल दुरुस्त केल्यानंतर परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या सर्व आक्षेपांची नोंद घेण्यात येईल. फक्त सादरीकरण पूर्ण करुन देण्यात

यावे. अध्यक्षांनीसुध्दा सर्व उपस्थितांना आवाहन केले की सादरीकरण पूर्ण होऊ द्यावे. आपण जे आक्षेप घेतलेले आहे, ते त्या स्वरुपातच इतिवृत्तात नोंद घेऊन शासनास सादर करण्यात येईल.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- असे म्हणाले की सादरीकरणास काहीही अर्थच नाही. त्यांनी अध्यक्ष यांना आपण शासकीय प्रक्रिया चालू ठेवण्याची विनंती केली, आमचा आक्षेप हा चुकीच्या ईआयए अहवालावर आहे. आम्ही संवैधानिक मार्गाने या प्रकल्पास विरोध करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण परत दर्शविण्यात सुरवात केली. **पर्यावरणाची** आधारभूत स्थिती ईआयए चा अभ्यास क्षेत्राबाबत माहिती देताना सांगितले की प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघाचा पर्यावरणीय अभ्यास करण्यात आलेला आहे. सर्वेक्षण हे हिवाळी हंगामाच्या माहितासीठी जानेवारी, २०२३ मध्ये आणि मान्सूनपूर्व/उन्हाळ्यासाठी एप्रिल-मे, २०२३ मध्ये करण्यात आले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवेची गुणवत्ता, ध्वनी पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांमध्येच होती. तसेच भूगर्भातील जल हे चांगल्या दर्जाच्या वर्गात येतात.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- यांनी येथे सांगितले की आमचा येथे तीव्र आक्षेप आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सर्वेक्षण हे मान्सून पूर्व व उन्हाळ्यात केलेले आहे. येथील जगणे हे पावसाळ्यावर अवलंबून आहे. येथे भूस्खलन (land slides) होते. त्यासाठी सर्वेक्षण हे पावसाळ्यात होणे आवश्यक आहे. एवढा मोठा प्रकल्प उभा करत असताना तीन्ही क्रृतुंचे, म्हणजे संपूर्ण वर्षेचा सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. श्री पवार यांनी सर्व उपस्थितांना मान्य आहे का विचारणा केली असता सर्वांनी एकमताने आवाजी मताने मान्य असल्याचे सांगितले.

त्यावेळी उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता आक्षेप नोंदविला की धमकवाडी येथे सांगितले की पाणी पिण्यायोग्य आहे. तर खिवशी गावाजवळचे पाणी हे आंघोळीसाठी योग्य आहे.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- यांनी सर्व मोसमांचे सर्वेक्षणाची गरज असल्याचे सांगितले.

पर्यावरण सल्लागार यांनी मातीची गुणवत्ता ही चांगली असल्याचे आढळून आल्याचे सांगितले. त्यावेळी श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी सांगितले की केंद्र सरकारच्या गौण खनिज विभागाच्या सर्वेक्षणाप्रमाणे ३८% या मातीत

Laterite आहे. गौण खनिज मुख्य Laterite आहे. Laterite म्हणजे Aluminium चा कच्चा माल. ६०० एकरामधील Aluminium चे जेव्हा उत्खनन होणार आहे, तेव्हा या उत्खननाचा बेहिशोबी गैरवापर होणार आहे. ६८५ टॉवरमध्ये ३,००० टन Laterite बंगळूरला १९९९-२००६ या कालखंडात पठारावरचे Laterite अकरा कंपन्यांनी नेलेले आहे. या प्रकल्पाच्या वरिल भागातील तलाव बांधताना खोदकामामध्ये ३८% Laterite चे उत्खनन होता कामा नये. माती चांगली हा दिशाभूल करणारा उल्लेख केलेला आहे. म्हणून याची नोंद घेण्यात यावी.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी मत मांडले की Laterite संदर्भात उपस्थित केला की जेथे बेसॉल्ट असते, तेथे भूस्खलन होण्याची शक्यता कमी असते. दोन वर्षांपूर्वी भूस्खलनाच्या ब-याच घटना झालेल्या आहेत. या पाटण तालुक्यात दोन गावे गेली, १०-१२ लोकांचा मृत्यू झालेला आहे. तर येथील परिसरात मातीमध्ये Laterite आहे हे गृहित धरलेले नाही. उत्खनानंतर संभाव्य जीवितहानी व पर्यावरण हानी याचा अहवालात काहीही उल्लेख नाही. याची इतिवृतात नोंद घेण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात पुढे सांगितले की परिसरात १०४ वनस्पती प्रजातीची नोंद करण्यात आलेली आहे. रेड डेटा बुक ऑफ इंडियानुसार निरीक्षण केलेल्या प्रजाती कोणत्याही स्थानिक किंवा RET श्रेणीमध्ये येत नाहीत.

श्री रोहन भाटे, ऑनररी वॉर्डन, सातारा जिल्हा यांनी याबाबत आक्षेप नोंदविला. रेड डेटा बुकच्या भरपूर वनस्पतीच्या प्रजाती आढळतात. या कट कॉपी पेस्ट अहवालात येथे ज्या पक्षांच्या प्रजाती आढळतात, त्या दाखविलेल्या नाहीत व ज्या नाहीत, त्या दाखविलेल्या आहेत. प्रकल्प परिसरात शेड्लुय १ च्या प्रजाती आहेत, त्या येथे जाणूनबूजून दाखविण्यात आलेल्या नाहीत. मूळात हा पर्यावरणीय संवदेनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) आहे. सह्याद्री टायगर प्रकल्पाच्या क्षेत्रात, कोयना वन्यजीव अभयारण्य हा प्रकल्प येतो.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री रोहन भाटे यांना तुमचा अहवाल लेखी स्वरुपात सादर करण्याची सूचना केली. संबंधित अहवाल हा इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सादरीकरणात जैविक पर्यावरण प्राणी विविधता निरिक्षण संदर्भात सांगितले की प्रायोगिक मासेमारी दरम्यान माशांची कोणतीही प्रजाती पकडली गेली नाही. अभ्यासक्षेत्रात एकूण २० प्रजाती आढळल्या. तसेच

सदरहू प्रकल्पाच्या जवळचे संरक्षित क्षेत्र सह्याद्री व्याघ्र प्रकल्प १.५ कि.मी. आणि कोयना वन्यजीव अभयारण्य ३.२ कि.मी. अंतरावर आहेत. त्यावेळी श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी आक्षेप की नोदविला की प्रस्तावित प्रकल्पातील खालचे जे तळे आहे, तेथे माशाच्या सात प्रजाती आहेत. त्यात रोहू, कटला इ. प्रजाती आहेत. जेव्हा पाणी खालच्या जलाशयातून वरच्या जलाशयात नेणार आहेत, त्यामुळे या सर्व माशांच्या प्रजाती या नष्ट होणार आहेत. येथील ५.८५ टीएमसीच्या खालच्या जलाशयातील माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होणार आहे. कारण पाणी हे स्थिर असेल, तरच माशांचे प्रजोत्पादन होते. खालच्या जलाशयातील माशांच्या प्रजाती या कायमच्या नष्ट होणार आहेत. हा पर्यावरणावर मोठा जैविक धोका आहे हा आमचा आक्षेप आहे.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी सूचना केली की जर हे सर्वेक्षण पावसाळ्यात केले असते, तर हजारो नव्हे तर करोडो खेकडे या परिसरात दिसतात. येथील पठारावरिल खेकडयांचा उल्लेखच नाही. खेकडा हा पर्यावरण जैव-विविधतेचा महत्वाचा घटक आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात पुढे सांगितले की अभ्यास क्षेत्रात सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील ७५ गावे व सातारा तालुक्यातील २२ गावे येतात.

त्यावेळी श्री देवराज दादा पाटील (दादा), कराड पंचायत समितीचे माजी अध्यक्षः- यांनी आक्षेप नोंदविला की पाटण व सातारा तालुक्यातील गावांबरोबरच कराड तालुक्यातील गावेसुध्दा या धरणावर आहेत. त्याचा उल्लेख अहवालात नाही, याबाबत आमचा आक्षेप आहे. या प्रकल्पाचा त्रास कराड तालुक्यालाही होणार आहे.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- यांनी सांगितल की हा जो खालचा जलाशय प्रकल्प झाला, त्यामुळे काही लोक विस्थापित झालेली आहेत. त्यामुळे काही लोक येथेच राहतात, तर काही लोक हे कराडला राहतात. अभ्यास करताना कराड तालुक्यातील गावे घेणे योग्य झाले असते. कारण ७-८ कि.मी. अंतरावर कराड तालुक्यातील गावे आहेत. तर सातारा जिल्ह्यातील बॅक साईडची गावे जर अभ्यासाला घेतात, तर जवळ असलेल्या कराड तालुक्यातील गावे अभ्यासासाठी घेणे योग्य होते. कारण ती गावे लाभार्थीसुध्दा आहेत. तरी ही अहवाल सदोष आहे, यावर आमचा आक्षेप आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कराड तालुक्यातील गावांवर या प्रकल्पाचा काय परिणाम होईल याचा अभ्यास अहवालात होणे गरजेचे आहे ह्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री बाळासाहेब सकपाळ, राहणार-सावरगाव- अभ्यासाचे क्षेत्र सांगितले ते पाटणच्या हद्दीपर्यंत जात आहे. म्हणजे पाटणच्या अलिकडच्या गावापासून ते ठोसेघरच्या पलिकडे पाच कि.मी. हद्द आहे. कोयना बॅक वॉटर, कोयनेतील अर्धे पाणी निनोणी गावामध्ये, पाटण गावाची हद्द् जेथे संपते, त्या गावापर्यंत. वास्तविक पहाता उंब्रजपर्यंत अभ्यास करायला पाहिजे होता. अभ्यासक्षेत्रातील लोकसंख्या ही चुकीची आहे. कारण मतदार संख्या काढली, तरी ती लाखात आहे, म्हणजे तेथील लहान मुले व सर्व धरी, तर दीड लाख लोकसंख्या आहे.

श्री संजयकुमार बाबुराव सोनावले, माहितीचा अधिकार कार्यकर्ता, साताराः- २६ नंबरच्या स्लाईडमध्ये अनुसुचित जाती व जमातीचा उल्लेख केलेला आहे. माझ्या माहितीनुसार २०११ ची कॉपी त्यांनी केलेली आहे. १९७८ साली वनविभागाने जमिनी अधिग्रहित न करता वन बसविले, त्यातील जास्तीतजास्त जमिनी अनुसुचीत जाती जमातीच्या आहेत. १९७८ चा आदेश आहे की त्या जमिनी अल्पभूधारक, मागासवर्गीय आहेत, त्यांना द्यायच्या आहेत, त्या जमिनी अजूनही दिलेल्या नाहित. तर त्यांना विस्थापित करुन दुसरा प्रकल्प लादला जात आहे. तरी अनुसुचित जाती जमाती तर्फे हा आक्षेप.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पुढे दर्शविताना परिसरातील पीकांची माहिती सांगितली. त्यावेळी श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की पीकांचा नमुना/crop pattern हा पूर्णपणे चुकीचा आहे. त्यांनी उपस्थितांना कोणकोणती पीके घेतात हे सांगण्याची सूचना केली.

त्यावेळी श्री विजय पवार, राहणार-तोंडोशी, जिल्हा-सातारा यांनी सांगितले की येथे सगळे पिकते. मी येथे सहा एकरमध्ये स्ट्रॉबेरी पिकविलेला शेतकरी आहे. येथ पेरुची बाग, केळीची बाग होती. येथील शेतक-यांची आर्थिक अडचण असते, म्हणून ते इतर पीके घेत नाहित. डोंगरावर पाऊस जास्त असते म्हणून येथील शेतकरी नाचणी करतात. मात्र येथील शेतक-यांना मार्गदर्शन केले तर तेसुध्दा स्ट्रॉबेरी पिकवतील. मी स्वतः तीन वर्षे स्ट्रॉबेरी पिकविलेली आहे. ही माती एवढी सुंदर आहे की काय पेराल, ते पिकणार आहे.

श्री प्रदीप निकम यांनी मत मांडले की नैसर्गिक पीक होतात, ती यादी वेगळी करावी. मात्र येथे पर्यावरणावर मुद्दे मांडलेच पाहिजे.

एडव्होकेट सिध्देश बापूसाहेब पवार, गाव- बांबवडे, गाव, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा:- सादरीकरण करताना पर्यावरण सल्लागार ३.१३ चा पॉईंट आपण स्कीप केलेला आहे. त्यावेळी आयोजक,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की कार्यकारी सारांश आणि सादरीकरण हे वेगळे आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सादरीकरणास सुरवात केली. त्यांनी बांधकाम टप्प्यातील पर्यावरणाचे प्रभावाबाबत माहिती सांगण्यास सुरवात केली.

त्यावेळी एडव्होकेट सिध्देश बापूसाहेब पवार, गाव- बांबवडे, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा:- मी दोन वेळा मुद्दा उपस्थित केला तर तो स्कीप करण्यात येत आहे. ३.१३ चा मुद्दा - प्रकल्पाचा ऐतिहासिक स्थळ, धार्मिक स्थळे, पुरातत्व ठिकाणे यावर कसा प्रभाव होणार आहे- मी दोन वेळा मुद्दा उपस्थित केला.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात नाही असे सांगितले असता एडव्होकेट सिध्देश बापूसाहेब पवार यांनी तुमच्या प्रकल्पामुळे धार्मिक स्थळे बाधित होणार नाही का अशी विचारणा केली. तो जर नंतर भाष्य करणार असाल, तर तो नंतर मुद्दा उपस्थित करता येईल.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावात जोतिबाचे जुने मंदिर आहे. त्या मंदिरात आजूबाजूचे लोक येतात. प्रकल्प क्षेत्रात मंदिर, मस्जिद येत आहेत. जर प्रकल्पामुळे ते बाधित झाले तर त्याचे नुतनीकरण सीएसआर निधीन्तर्गत करण्यात येईल.

एडव्होकेट सिध्देश बापूसाहेब पवार यांनी सांगितले की तोंडोशी गावाच्या हद्दीत रामघळ नावाचे देवस्थान आहे. तेथे हिन्दु साधू राहतात, हिंदू धर्मीयांची तेथे आस्था जोडलेली आहे. प्रकल्पाच्या एक कि.मी. हद्दीतील धार्मिक स्थळे सोडून ५० कि.मी. लांब वजराई धबधब्याचा उल्लेख आहे. नैसर्गिक धबधब्यावर प्रकल्पामुळे काय आघात होतील याचा उल्लेख नाही. ५० कि.मी. लांब पाहणी केली, मात्र एक कि.मी.मधील धार्मिक स्थळ दिसले नाही.

उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता अहवालात जळोशीचे जोतिबाचे मंदिर घेतले. प्रकल्प होणा-या त्रमबे गावात तीन मंदिरे आहेत, तर एकाही मंदिराचा उल्लेख नाही. याची दखल घेण्यात यावी.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- यांनी येथे मत मांडले की काही देव स्थानिक असतात. पण जळोशीचा जोतिबा हा कुलस्वामी आहे. २-४ तालुक्यातील लोक येतात.

उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता मागच्या स्लाईडमध्ये पर्यावरणाचा काहीही त्रास होणार नाही असे लिहिलेले आहे. तर बांधकाम करताना ब्लास्टींग, ड्रिलिंग करणार नाहीत का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कामाच्या टप्प्यात कोणताही पर्यावरणावर प्रभाव होणार नाही.

उपस्थितांपैकी एकाने नाव न सांगता आक्षेप नोंदविला- त्यांनी सांगितले की गेल्या दोन वर्षांपूर्वी येथे अतिवृष्टी झाली, त्यावेळी येथील कित्येक गावे ही स्थलांतरित करावी लागली. कळंबेसारखे गाव १५-२० दिवस त्या गावातील लोक हे बाहेर राहिले, तर त्या गावांना ब्लास्टींग, ड्रिलिंगमुळे काही त्रास होणार नाही असे कसे म्हणता. तो जास्त त्रास होणार आहे. हा प्रकल्प बांधकाम करताना या परिसरातील गावे यांना काय धोके संभवतात, याचा काहीही उल्लेख या अहवालात नाही. तरी त्याची नोंद अहवालात घेण्यात यावी. आज बैठकीस प्रकल्प बाधित गावातील बरेच स्त्री-पुरुष आलेले आहेत. बैठकीत पावसाळ्यात सर्वेक्षण होणे गरजेचे आहे हा मुद्दा चर्चिला गेलेला आहे. पावसाळ्यात येथील ग्रामस्थ आपले घरदार सोडून निवा-यासाठी दुसरीकडे राहिले होते. याचा विचार अहवालात केला गेलेला नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थित नागरिकांना विनंती केली की स्थानिक व ग्रामस्थ अतिशय चांगले मुद्दे मांडत आहेत. त्याची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. मात्र त्याचबरोबर ते लेखीस्वरुपातसुध्दा सादर करण्यात यावेत. ते स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात सादर करण्यात यावेत. आपल्या लेखी सूचना, आक्षेपास प्रकल्प प्रवर्तकांकडून उत्तर घेण्यात येऊन ते इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येतील. तेथील तज्ज समिती याबाबत योग्य निर्णय घेतील.

श्री बाळासाहेब शिंदे, माजी पंचायत सदस्य यांनी सांगितले की एक लेखी आक्षेप नोंदविलेला आहे. त्याची पोच आहे. त्याचे अहवाल आमच्याकडे आहेत. जरी प्रकल्प अधिकारी परिणाम होणार नाही असे सांगत असतील तरीही परिणाम होणार आहेत. कळंबे, डफळवाडी, केंजळवाडी, निवडे उठून गेलेले आहे. तोंडोशी खाली आहे, जळू आहे. उर्वरित भाग जळू वगैरे. २२ जुलै, २०२१ ला जी अतिवृष्टी पाटण तालुक्यात

झाली, ३-४ पिढ्यांच्या लोकांनी असा पाऊस पाहिलाच नव्हता. घरेच्या घरे पाटण तालुक्यातील गाडली गेली. २-२ फुट जमिन दुंभगली गेली. या गावांना महसूल विभाग पाऊस सुरु झाला की नोटीस देते. त्यांना सूचना देण्यात येते की सुरक्षित ठिकाणी, शाळेत, हायस्कूलमध्ये आपली सोय करण्यात आलेली असून आपण पावसाळ्यात येथून हलावे. आपल्या गावाला धोका आहे. त्यांच्या अंगावर नव्हते, त्यांना मदत करण्यात आली. रात्ररात्र जागलेली गावे आहेत. अगदी बागवेवाडी पर्यंत. तरी प्रकल्प अधिकारी प्रकल्पाचा काहीही त्रास होणार नाही असे म्हणतात हे पूर्णपणे चुकीचे आहे. ब्लास्टींग, ड्रिलिंग, बोगदा काढून पाणी नेणार असाल तर निश्चितपणे या गावांना धोका आहे.

श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी सह्याद्री पठार हे पृथ्वीच्या उत्क्रांतीनंतर जागतीक वारसांमध्ये आहे. सह्याद्रीच्या या पठारामध्ये भूगर्भामध्ये भूकंपाचे केंद्र नाभी/बिंदू आहे. २.२ रिश्टर ते ४.२ रिश्टर एवढे क्षमतेचे भूकंप या परिसरात प्रयोगशाळेत दररोज नोंदविले गेलेले आहेत. या ड्रिलिंग व ब्लास्टींगमुळे कोयना धरणाला जो धोका आहे, त्यामुळे भूगर्भामध्ये आणि खडकांमध्ये हालचाली होणार आहेत. हा आंतरराष्ट्रीय वारसा उध्वस्त होणार आहे. आंतरराष्ट्रीय वारसा लाभलेला हा सह्याद्री पठार ड्रिलिंग व ब्लास्टींगमुळे भूकंपाचा केद्र नाभी/बिंदू हलणार आहे. हा भूकंपाची नाभी दुसरीकडे जाणार आहे. भारताचे पर्यावरणाचे जागतीक नुकसान होणार आहे. धरणाजवळ ब्लास्टींग करणे किती विरोधी भूमिका येथे घेण्यात येत आहे.

एडव्होकेट श्री चेतन कणसे, राहणार -प्रकल्पासाठी तयार केलेला ईआयए अहवाल कोणत्या संस्थेने तयार केला हे स्थानिकांना सांगण्यात यावे. अहवाल तयार करताना कोणकोणत्या घटकांनी केला. ईआयए अहवाल तयार करण्यापूर्वी प्रकल्प बाधित गावात प्रकल्पाविषयी व प्रकल्पात राबविण्यात येणा-या पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी काही जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे काय?

आमच्या माहितीप्रमाणे प्रकल्पाविषयी आता बैठकीत माहिती सांगण्यात आलेली आहे. सदरहू प्रकल्प समुद्रसपाटीपासून किती अंतरावर आणि उंच आहे, याचा अहवालात व सादरीकरणात कुठेही उल्लेख नाही. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ नुसार एक हजार मीटर उंचीचे प्रकल्पास बंदी आहे. त्यास पर्यावरण अनुमती मिळत नाही. या प्रकल्पामुळे डोंगरावरिल वन्यजीव हे खाली येतील. आताच बिबटे. गवे गावात यायला लागले आहेत. याचा कुठेही उल्लेख अहवालात नाही.

पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय्रए) अहवालासाठी सर्वेक्षण करताना बाधित गावातील लोकांचा सहभाग घेण्यात आलेला आहे काय? तसेच लोकप्रतिनिधींनी विश्वासात घेतले आहे काय?तसेच सदरहू प्रकल्प हा सरकारचा प्रकल्प आहे का खाजगी प्रकल्प आहे याचीही माहिती स्थानिकांना देण्यात यावी.

येथील ताराळी नदीचे पाण्यासाठी लवाद ठरलेला आहे. लवादानुसार वाटपाचे क्षेत्र ठरलेले आहे. याबाबत अहवालात कुठेही उल्लेख नाही. त्यांनी उपस्थितांना सांगितले प्रकल्प लवादाने येथील क्षेत्रास मंजूर केलेले पाणी काढून घेणार आहे याची नोंद सर्व उपस्थितांनी घ्यावी.

श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त संघटना श्रमिक मुक्ती दल - कृष्णा पाणी वाटपाचा बच्छावत अहवाल १९७८ साली आला. महाराष्ट्राला ५९५ टीएमसी पाणी मिळाले. लवादाकडे परत अपिल करुन काही टीएमसी पाणी वाढवून मिळाले. पाणी वाढवून दिल्यानंतर प्रत्येक धरणाच्या परवानगीसाठी लवादाकडे जावे लागते. ताराळी धरणासाठी रिझर्व पाणी जे लवादाकडून घेतले होते, त्या व्यतिरिक्त हे पाणी आहे. आणि पावसाळ्यात अडविलेले पाणीसुध्दा गृहित धरले जाते. तर त्याबाबत परवानग्या घेतल्या वा नाही याची काहीही माहिती देण्यात आलेली नाही. या वर्षी कमी पाऊस झाला. ताराळी धरण पूर्णपणे भरले नाही. अशी परिस्थिती दर २-४ वर्षांनी अल-निनो मुळे येऊ शकते. जर धरणातील पाणी कमी येथे उपलब्ध होणार असेल, तर या प्रकल्पासाठी कोठून पाणी आणणार आहात? जे खालील लोक पिण्याच्या पाण्यासाठी, शेतीच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत, त्यांच्या पाण्यावर हे सरळसरळ अतिक्रमण आहे. हा महत्वाचा मुद्दा या सर्वेक्षणात, अभ्यासात समाविष्ट नाही. त्याहूनही कृष्णा पाणी वाटप बच्छावत अहवाल, जलसंधारण खाते याचा काहीही उल्लेख ईआय्रए अहवालात नाही.

श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी आक्षेप नोंदविला की सर्वात महत्वाचे म्हणजे ताराळी प्रकल्पाचा पुनर्वसनाचा लाभक्षेत्रात वंचित गावांना त्यांना कधिही पाणी सिंचनासाठी मिळणार नाही. लाभक्षेत्रातील ४३ गावे आहेत. या गावांना वाऱ्यावर सोडून एका खाजगी उद्योजकाला चोरलेली वीज कमी दरात घ्यायची आहे. पवन उर्जा आणि आण्विक उर्जा ही रात्री ४ रुपये १० पैसे युनिटने घ्यायची आणि ती ७ रुपये २० पैशांनी उद्योगांना विकायची. सरकारची वीज आणि पैसे कमणार खाजगी कंपनी. जंगल आमचे, जमिन आमची, धरण आमचे, घर आमचे उधवस्त होणार, आणि खाजगी उद्योजक पैसे कमविणार. पुनर्वसनाचे अद्यापपावेते

६७६ खातेदार शिल्लक आहेत. ते पुनर्वसनापासून वंचित आहेत. सरकारला पुनर्वसनासाठी द्यायला जमिनच नाही. ही पुनर्वसित गावे नागरी सुविधांपासून वंचित आहेत. तरी हा प्रकल्प येथील पर्यावरण उधवस्त करणारा प्रकल्प असून त्या प्रकल्पाविरुध्द तीव्र विरोध आम्ही नोंदवित आहोत.

श्री जयवंतराव साळुंखे चोरेकर- प्रकल्पास सर्वाचाच विरोध आहे,त्याचप्रमाणे माझाही प्रकल्पास विरोध आहे. ताराळी धरणाची निर्मिती ही शेतीच्या पाण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी झालेली आहे. या धरणामुळे पुनर्वसित झालेली गावे ही माझ्या चोरे आणि परिसरात आहेत. यात उल्लेख करावा लागेल, त्यात पाम्बे, निवडे असतील. त्या लोकांचे पुनर्वसन अद्याप पूर्ण झालेले नाही. ज्यावेळेस लोकांना विस्तापित केले, त्यांना ज्या गावात पुनर्वसित करण्यात येईल, त्या भागातच जमीन वाटप करण्यात येईल, त्यांना अजून जमिन वाटप करण्यात आलेले नाही. ज्या भागात जमिन देणार, त्या १००% ओलिताखाली आणण्याचे शासनाने हमी दिलेली असताना आज शासनाने एकाही गावात शेतीसाठी पाणी पुरवठा व्यवस्था पुरविलेली नाही. म्हणजे ज्या लोकांच्या त्यागामुळे धरण उभे राहिले, त्या लोकांना वा-यावर सोडायचे, नविन प्रकल्प उभा करणार आणि हा प्रकल्प जेथे उभे करणार, जो हेतू शासनाचा होता, जे वीजनिर्मितीतून येणार पाणी, आपण कोयनेतून पाहतो, थेट समुद्राला जाते. आता वीजनिर्मितीचे पाणी नदीपात्रात सोडणार आहेत, ते पाणी पुनर्वसित गावात नाही, तर लाभक्षेत्रातील नदीपात्राच्या सर्व गावातील शेती नापीक होणार असून त्या भागातील प्राण्यांना मरावे लागणार आहे. कितीही माणूस मोठा असला, तरी सर्वसामान्य जनता, आसपासचे पक्षी आणि प्राणी महत्वाचे आहेत, म्हणून प्रकल्पास विरोध आहे. कोणालातरी मोठे करण्यासाठी जर सामान्य जनतेस त्रास व विस्थापित करत असतील तर जनता ते करुन देणार नाही. आम्ही रक्त सांडवून संघर्ष करु, पण कुठल्याही प्रकारे प्रकल्प होऊ देणार नाही.

प्रकल्प सल्लागार यांनी पुढे सादरीकरण करण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की विकास आराखडयामध्ये दहा कोटी रुपये सीएसआर निधीला मिळतील.

त्यावेळी श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार ६ यांनी सांगितले की नागरी सुविधा परिसरातील नागरिकांच्यासाठी आवश्यक आहे. त्यासाठी एका ठिकामी दहा कोटी, एका ठिकाणी वीस कोटी म्हटले आहे. तर त्याठिकाणी टक्केवारी का ठरवत नाही. परिसरातील विकासासाठी सीएसआर निधीच्या ५०% निधी परिसरातील विकास कामांसाठी राबवू अशी अहवालात नोंद का नाही? तशी हवी.

सीएसआर निधिची भूलधाप प्रकल्पग्रस्तांना देऊ नका. सीएसआर तरतुद ही प्रकल्पग्रस्तांसाठी धूळफेक आहे. जगातील एक श्रीमंत माणूस फक्त दहा कोटी रुपये परिसर विकासासाठी खर्च करणार ही धूळफेक आहे. संपूर्ण दिशाभूल करणारा ही प्रकल्प आहे.

श्री. प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- श्रमिक मुक्ती दल येथे जेव्हा पवन- उर्जा प्रकल्प झाला, त्यावेळी स्थानिकांकडून विरोध करण्यात आलेला होता. नंतर त्या प्रकल्पात ग्रामपंचायतीचा सहभाग नोंदविला गेला. नंतर ग्रामपंचायतीस प्रतिवर्षी प्रति मेगावॅट पंधरा हजार रुपये त्या त्या ग्रामपंचायतीस देण्यात येतात. पूर्वी प्रकल्प झाले, त्यात ग्रामपंचायतींचा अधिकार मान्य करण्यात आलेला आहे. त्या पवन-उर्जा प्रकल्पात काहीही धोकादायक नसल्याने स्थानिक जनतेने त्यास पाठिंबा दिला. या प्रकल्पात दाखविण्यात आलेली सीएसआर निधी तरतुद लोकांना मान्य होईल असे नाही.

श्री. पाटील, आता जे सीएसआर निधी संदर्भात जी माहिती देण्यात आली, तर ही तरतुद कार्यालयात बसून करण्यात आलेली आहे. स्थानिक गरजांचा विचार करण्यात आलेला नाही. या डोंगरभागात शभर मीटर अंतरावर शाळा आहे. अहवालात शाळेचा उल्लेख नाही. येथील स्थानिक लोक, त्यांच्या गरजा यांच्या विचार न करता सीएसआर निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. हा प्रकल्प जर येथील स्थानिकांना देशोधडीला लावणार असेल तर या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

एडव्होकेट कणसे - ३३ नंबरची स्लाईड घेण्यात यावी. त्यांनी मुद्दा क्रमांक १ वाचून दाखविला. त्यामध्ये नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यमुळे शेती पीके फळबागांचे नुकसान आणि पशुधनांचे नुकसान याद्वारे मानव व वन्यजीव संघर्षदेखील होईल. म्हणजे प्रकल्प प्रवर्तक यांनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. म्हणजे येथील वन्य जीव व स्थानिक यांच्या संघर्ष निर्माण होईल. तरी या प्रकल्पास पर्यावरण संरक्षण, वन्यजीव संरक्षण तीव्र विरोध आहे. तसेच मुद्दा क्रंमाक २ मध्ये असे प्रतिपादन केलेले आहे की हरितपट्टा विकास योजना आणि जनजागृती कार्यक्रमांसह जैवविविधता संवर्धन आणि वन्यजीव व्यवस्थापन योजनेंतर्गत प्रस्तावित हस्तक्षेपांची अंमलबजावणी करुन हे परिणाम कमी केले जाऊ शकतात. याबाबत भविष्यात करण्यात येणा-या उपाययोजनांबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. प्रकल्पामुळे डोंगरावरिल वन्यजीव हे खाली येणार. आताच परिसरातील बिबटे, गवे हे मानववस्तीत येऊन हल्ला करायला लागलेले आहेत. तर हरितपट्टा विकास, जनजागृती कशी करणार, अंमलबजावणी

योजना, वन्यजीवांमुळे मानवी जीवांचे नुकसान, शेतीचे नुकसान कसे टाळणार यांचे सविस्तर स्पष्टीकरण येथे बैठकीत करण्यात यावे.

श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकार यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की महत्वाचा मुद्दा येथे उपस्थित करण्यात येत आहे. MERC च्या कायद्याप्रमाणे तयार झालेली वीज एमएसईबीच्या ग्रीडला पवनचक्क्या पुरवित आहेत. तेथे पवन उर्जेचे रॅकेट आहे.

श्री नवनाथ माने, राहणार-तोंडीशी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा:-
येथील चार गावे तोंडीशी, तळवे, -------,------- ही चार गावे प्रभावित होणार आहेत. या बाधित गावांच्या ग्रामपंचायतींनी या प्रकल्पाविषयी कंपनीने किंवा शासनाच्या माध्यमातून कळविलेले नाही. डांगस्तेवाडीचा प्रत्यक्ष संबंध या प्रकल्पाशी येत नाही. मात्र दिशाभूल करण्यासाठी डांगत्सतेवाडीच्या गावाचा उल्लेख करण्यात येतो. येथील गावात पूर्वापार चाललेली शेतीची पध्दत आहे § त्यास आडवा पाट म्हणतो, गुरुत्वाकर्षणाच्या माध्यमातून शेतीला पाणी दिले जाते. या प्रकल्पामुळे आडवा पाट शेती जी पूर्वापार पध्दत आहे, ती शेती ओलिताखाली आलेली आहे, ती पूर्णपणे उध्वस्त होणार आहे.

प्राध्यापक अशोक पाटील, सध्या राहणारा, मुंबई - मी मुंबईहून आलेलो आहे. ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. आमच्या हरकती लिहून पाठविलेल्या आहेत. त्या हरकतींविषयी कोणीच काही बोलत नाही. लोकांनी प्रश्न मांडला की प्रस्तावित वीज उत्पादन झाल्यानंतर ही वीज ग्रीडला देणार आहेत का स्वतंत्रपणे ग्राहकाला देणार याबाबत माहिती नाही. त्यांनी सांगितले की कंपनीचे पर्यावरण सल्लागार गुरुग्राम, हरियाणा येथील आहेत, कंपनी ही महाराष्ट्रात स्थापन करणार आहे. सादरीकरण हे पर्यावरण सल्लागारच करत आहेत. प्रकल्पात ब-याच त्रुटी आहेत. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना केलेले सर्वेक्षण हे वर्षभराचे नाही. येथे उन्हाळ्यात वेगळे वातावरण, हिवाळ्यात वेगळे वातावरण असते. मला अभिमान वाटतो की येथील लोक पर्यावरणाबाबत जागरुक असून त्यांनी अत्यत योग्य त्या सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. येथील स्थानिक पीकांचा उल्लेख अहवालात नाही. त्यावेळी सांगण्यात आले की स्ट्रॉबेरी, मलबरी, पाचगणी महाबळेश्वरला जी फळे होतात, ती येथे तयार होतात. येथील स्थानिक प्राण्यांची माहिती योग्य प्रकारे नाही. येथील खेकड्यांचा उल्लेख नाही. प्रकल्पात असा उल्लेख आहे की प्रकल्पामुळे जर धार्मिक स्थळ बाधित झाले, तर त्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्यात येईल. म्हणजे ते

हमी देत नाहीत. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की सीएसआर निधी दहा कोटी खर्च करणार या मुद्द्यावर भाळून जाऊ नका. मी सामाजिक कार्यकर्ता आहे, त्यामुळे माझी विनंती राहिल की प्रकल्प प्रवर्तकांनी ही प्रकल्प पूर्ण करावा. मात्र हा ईआयए अहवाल हा पक्षपाती आहे. आणि पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत पर्यावरणाबाबत हरकती, सूचना व त्यांचे उत्तरे देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण सादर करण्यास सुरवात केली. प्रस्तावित प्रकल्पात रोजगाराची संधि देताना स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल.

त्यावेळी श्री विजय पवार, तोंडोशी, जिल्हा-सातारा यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प सुरु झाल्यानंतर तुम्ही कॅन्टीन चालविण्यासाठी बाहेरिलच माणसे आणणार. आपण बाहेरचेच कंत्राटदार नियुक्त करणार. प्रकल्पात स्थानिक लोकांनाच प्राधान्य देण्यात यावे.

यावेळी श्री सकपाळ यांनी उपस्थितांना आवाहन केले की ही पर्यावरणविषयत जनसुनावणी असून आपण प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक प्रश्न उपस्थित करणे अपेक्षित आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सादरीकरण पूर्ण झालेले असून उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदवावयाचे असल्यास त्या त्यांनी उपस्थित कराव्यात. त्याची नोंद बैठकीच्या इतिवृतात घेण्यात येईल. सूचना, आक्षेप नोंदविण्यापूर्वी प्रत्येकाने आपले संपूर्ण नांव व राहण्याचे ठिकाण सांगावे.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

१) श्री सुरेश पाटील, गांव-नाटे, तालुका-पाटण,जिल्हा-साताराः-

मी एका पक्षाचा कार्यकर्ता आहे. लोकांच्या भल्यासाठी येतात की लोकांना उध्वस्त करण्यासाठी येतात हा प्रश्न आहे. तालुक्यात पाच धरण झाली. कुठल्या शेतक-याचा फायदा झाला, कुठल्या पर्यावरणावर बदल झाला, लोक भूलथापांना फसतात, लोकांना कुठलीही सूचना, कल्पना न देता पर्यावरणावर चर्चा येथे चालू आहे. आज या क्षेत्रात अनेक औषधी वनस्पती आहेत. त्या नष्ट होतील. येथे तालुक्यात पवनचक्क्या आल्या, त्यावेळी येथे हजारो झाडे लावण्याचे आश्वासन देण्यात आलेले होते, पर्यावरणाचा ----हास होणार नाही, कुटुंबातील व्यक्तीला

रोजगार देण्याची हमी दिलेली होती, या प्रकल्पास विरोध १००% व्हायला पाहिजे. माझा या प्रकल्पास विरोध आहे.

येथे श्री नवनाथ सकपाळ, स्थानिक यांनी उपस्थितांना विनंती केली की आपण प्रथम पर्यावरणवादी संस्था आणि आरटीआय कार्यकर्ते, नंतर कळंबे ग्रामस्थांतर्फे त्यांचे वकील, नंतर श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटनाः- बोलतील.

२) श्री किरण लोहोकरे, राहणार- पुणे

मी डॉ. भारत पाटणकर, मंथन संस्थेचे श्रीपाद धर्माधिकारी आणि इतर यांचा प्रतिनिधी म्हणून बोलत आहे. ही जनसुनावणी ही प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणाम व त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक भविष्यात घेणार असलेल्या उपाययोजना याची माहिती स्थानिकांना देण्यासाठी होती. हा प्रकल्प लोकांना समजून सांगणे, लोकांशी चर्चा करुनच योजना राबविणे अपेक्षित होते. मात्र येथे लोकांशी चर्चा न करता सादरीकरणात ३७-३८ स्लाईड्स दाखविण्यात आल्या व येथील स्थानिकांनी त्यातील ब-याच त्रुटी दाखवून आक्षेप नोंदविलेले आहेत. डॉ. भारत पाटणकरांच्या माध्यमातून बरेच मुद्दे देण्यात आलेले होते, स्थानिकांनीसुध्दा अतिशय चांगल्याप्रकारे आक्षेप नोंदविलेले आहेत. प्रकल्पासाठी अभ्यास, सर्वेक्षण जे झालेले आहे, त्यास सर्वांनी आक्षेप नोंदविलेला आहे. जी माहिती गोळा करण्यात आली, त्यावरही सर्वांचाच आक्षेप आहे. उपस्थितानी जे मुद्दे सांगितले, त्या व्यतिरिक्त इतर मुद्द्यांवर मी येथे भाष्य करणार आहेः-

आक्षेप क्रं. १ -

हा अहवाल कॉपी पेस्ट अहवाल आहे. हा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला होता, मात्र तेथेही या अहवालाचे अवलोकन झालेले दिसत नाही. आंध्र प्रदेशचा उल्लेख या अहवालात येतो आणि असे असून कोणीही तो तपासला नाही.

आक्षेप क्रं. २ -

दुसरा आक्षेप वनजमिन संदर्भात. एका ठिकाणी म्हटले जाते की वनजमिन अधिग्रहित केली जाणार नाही, तर दुसरीकडे टी.ओ.आर मध्ये वनजमिन ६३.१०

हेक्टर घेणार असा उल्लेख आहे. अशी विसंगती एकाच अहवालात कशी असू शकते? हा गंभीर मुद्दा असून आमचा त्यावर आक्षेप आहे

आक्षेप क्रं. ३ -

तिसरा आक्षेप हा पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवाल तयार करताना केंद्र सरकारने काही निर्देश पारित केलेले आहेत. त्यानुसार ही ईआयए अहवाल करणे अपेक्षित आहे. त्यातील पहिला मुद्दा हा प्रकल्प स्थापन व कार्यान्वित करण्यासाठी काही पर्याय आहे काय? या संदर्भात अभ्यास होणे गरजेचे होते. या प्रकल्पासाठी दुसरे पर्यायी प्रकल्प स्थळ (Project Site) बाबत कुठलाही उल्लेख नाही.

आक्षेप क्रं. ४ -

परिसरातील नैसर्गिक झ-यांवर (natural streams) या प्रकल्पाचा काय परिणाम होईल, ही माहिती अहवालात अपेक्षित होती. ती नाही. एवढ्या मोठ्या प्रकल्पाचा येथील नैसर्गिक झ-यांवर (natural streams) परिणाम होणारच आहे.

आक्षेप क्रं. ५ -

प्रकल्पात खालील जलाशयाचे पाणी हे उचलून वरच्या जलाशयात नेणार आहेत. त्यामुळे खालच्या जलाशयातील जलचरांच्या जीवनचक्रावर परिणाम होईल. त्याचा पर्यावरण परिणाम होणारच आहे. त्याचा अहवालात उल्लेख करण्यात आलेला नाही.

म्हणजेच प्रकल्प प्रवर्तकानी टी.ओ.आर. च्या निर्देशांचे उल्लंघन केलेले आहे. याबाबत आमचा तीव्र आक्षेप आहे.

आक्षेप क्रं. ६ -

पुढचा मुद्दा सिंचनाचा. याबाबत बरेच लोक बोललेले आहेत. माझ्याकडे जी आकडेवारी आहे, त्यानुसार या प्रकल्पासाठी १०.४२ दशलक्ष घनमीटर पाण्याचा वापर होणार आहे. त्यामुळे ढोबळमानानुसार खालील भागातील सुमारे २,००० हेक्टर ओलिताचे क्षेत्र कमी होणार आहे. या परिणामावर आमचा आक्षेप आहे.

आक्षेप क्रं. ७ -

भूजलावर काहीही परिणाम होणार नाही असे सांगण्यात आलेले आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासाठी सर्वेक्षण करत असताना भूजलाच्या

गुणवत्तेबाबत, पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत त्यांनी जे पाण्याचे नमुने तपासले आहेत, ते मानकांच्या मर्यादेत आहेत, मात्र त्या पाण्याच्या नमुन्यांची तुलना ही स्विकार्य मर्यादेशी केलेली पाहिजे. हा आमचा आक्षेप आहे.

आक्षेप क्रं. ८ -

परिसरातील जैवविविधतेवर अनेक भयानक परिणाम होणार आहेत. बैठकीत स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार परिसरातील अनेक प्राणी, वनस्पती हे रेड संवर्गात येत आहेत. प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवालात ती माहिती दिलेली नाही.

आक्षेप क्रं. ९ -

बैठकीत उपस्थितांनी अगोदरच सांगितलेले आहे की प्रकल्प परिसर ही भूकंपप्रवण क्षेत्र आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू हा जवळ आहे. याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवालात कुठलीही माहित सांगण्यात आलेली नाही.

हे माझे गंभीर आक्षेप आहेत. याची नोंद घेण्यात यावी. आम्ही लेखी आक्षेपसुध्दा नोंदविलेले आहेत. तरी हा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल पुनः करण्यात यावा व नंतर परत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

३) श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना - श्रमिक मुक्ती दल -

ड़ॉ. भारत पाटणकर येथे येऊ शकले नाहित. येथे बैठकीत बरेच प्रकल्पग्रस्त आहेत. पाटण तालुका हा असा एकमेव तालुका महाराष्ट्रात आहे की त्यात एक अतिभव्य धरण, सात मोठी धरणे आणी सतरा छोटी धरणे आहेत. या सर्व प्रकल्पासाठी पाटण तालुक्याच्या रहिवाशांनी खूपच सहन केले, म्हणजे या प्रकल्पासाठी अतिक्रमण, विस्थापन सहन केलेले आहे आणि आता या नविन प्रकल्पासाठी अजून परत अतिक्रमण आणि विस्थापन का सहन करायचे हा प्रश्न या प्रकल्पामुळे पाटण तालुक्यातील रहिवाशांचा आहे. असा समज झालेला आहे की परत आणखी एक प्रकल्पासाठी येथील स्थानिकांना विस्थापित व्हावे लागेल, मिळत असलेल्या

पाण्यापासून वंचित व्हावे लागेल. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पामुळे संभाव्य बाधित क्षेत्रातील लोकांचा प्रकल्पास तीव्र विरोध आहे. मी आता मुख्य मुद्दे मांडतो

आक्षेप क्रमांक १ -

सुरवातीसच आम्ही सांगितले की हा क्रॉपी पेस्ट अहवाल आहे. त्यामुळे ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही बेकायदेशीर असून ती रद्द करण्यात यावी

आक्षेप क्रमांक २ -

ईआयए अहवाल पान क्रं. ६ वर १५० हेक्टर जमिन मागितलेली आहे. वरच्या जलाशयासाठी बाधित होणारी जमिन ही सपूर्ण वनक्षेत्रात येते असे अहवालात लिहिलेले असताना पर्यावरण सल्लागार यांनी बैठकीत खोटे सांगत आहेत की वनजमिन येत नाही. नंतर परत प्रश्न क्रमांक १७ वर अतिरिक्त ६३ हेक्टर वनजमिन आवश्यक आहे असे म्हटले आहे. म्हणजे किमान १२५-१५० हेक्टर जमिन गृहित धरलेली आहे. टीओआर मधील कोणत्याही किंवा अनेक अटींचे पालन केले नाही तर ईआयए हा अपूर्ण व अस्विकार्य आहे.

आक्षेप क्रमांक ३ -

पुढचा मुद्दा हे धरण हे सिंचनाचे धरण आहे. यात किती पाणी साचते या अभ्यास आपण प्रकल्पाच्या बाजूने केलेला आहे. दर वर्षी डिसेंबर-जानेवारीपासून धरणातील पाण्याची पातळी ही कमी होत जाते. हा प्रस्तावित प्रकल्प २४X७ चालणारा ३६५ दिवस चालणारा प्रकल्प आहे. मे महिन्यात पाण्याची पातळी ही खूपच खाली जाते. म्हणजे प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पाची जी व्यवहार्यता ( feasibility ) सांगत आहेत, ती पूर्णपणे चुकीची आहे. तर आमचा संशय आहे की आपणास संपूर्ण पाण्याचा उपभोग घ्यायचा आहे.

आक्षेप क्रमांक ४ -

जेव्हा Weak Period § दुबळे अंग जेव्हा असते, त्याचा बेस्ट फ्लो चा अभ्यास ईआयए अहवालात केलेला नाही किंवा तो मोजलेला नाही, त्याचा कुठेही उल्लेख नाही.

आक्षेप क्रमांक ५ -

पाणी वर खेचल्याने जी पाण्याची खोली कमी होणार आहे, त्याचे मुल्यांकन हे पूर्णपणे चुकीचे आहे. आमच्या माहितीप्रमाणे १०.४२ पाणी राखीव ठेवणे आवश्यक आहे. ते राहिल असे कागदोपत्री दाखविलेले आहे, प्रत्यक्षात असे होईल असे वाटत नाही. आम्ही लेखी सूचना सादर केलेल्या असून परत सादर करण्यात येत आहेत. त्याचा सविस्तर आढावा घेण्यात यावा. आज बैठक संपल्यावर जी आढावा बैठक घेण्यात

येणार आहे. त्यात निवडक प्रतिनिधींना बोलविण्यात यावे. बैठकीचे इतिवृत तयार करताना आमच्या सर्व मुद्द्यांचा विचार व्हावा. तसेच आजची जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी अशी आमची मागणी आहे.

४) श्री शिवाजी राऊत, पर्यावरणवादी, स्वतंत्र पत्रकारः-

बैठकीत मी माझे मुद्दे मांडलेले आहेत. त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. मी प्रस्तावित प्रकल्पाविषयी माझे आक्षेप २५ दिवसांपूर्वी सर्व विभागांना पाठविलेले आहेत. आक्षेप नोदविताना मी माझ्या प्रती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (Anti-Corruption Bureau), केंद्रीय दक्षता आयोग (Central Vigilance Commission), अंमलबजावणी संचालनालय ( ED Enforcement Directorate) यांना सादर केलेल्या आहेत आणि पुढेही सादर करणार आहे. महाराष्ट्र सरकार या प्रकल्पासाठी २०१४ ला अधिसूचना काढते आणि २०२४ ला प्रकल्पास भारत सरकारची पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी होते,

मात्र एक Whistle Blower Activist म्हणून काम करत असताना येथे या प्रकल्पास सर्वांचाच विरोध असताना जर प्रकल्पाच्या अनुकूल अहवाल केंद्र सरकारला गेला, तर एक Whisle Blower Activist म्हणून मी केंद्रीय दक्षता आयोग (Central Vigilance Commission) सर्व शासकीय अधिका-यांची चौकशी करण्याची अगोदरच मागणी केलेली आहे. भारतीय नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे हे केंद्र व राज्य सरकारने करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. हा प्रकल्प बड्या भांडवलदाराच्या घशातून वाचविणे, ही जीवन-मरणाची लढाई आहे.

तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस आमची विनंती आहे की या प्रकल्पाच्या विरुध्द सनदशीर मार्गाने आम्ही मोर्चा काढू, सत्यागृह करु. बैठकीत सर्वांनीच विरोध केलेला आहे. तो अहवालात नोंदविला गेला नाही, तर २०१४ ला प्रकल्पास मंजूरी देणारे व २०२४ ला ही बैठक आयोजित करणारे प्रशासनाचे सर्व अधिकारी जबाबदार राहतील. त्याचप्रमाणे बैठकीत व नंतर माझ्या जीवितास धोका असल्याने त्याची जबाबदारी ही शासनाने घ्यावी असे निवेदन मी येथे जिल्हादंडाधिकारी यांच्या प्रतिनिधींना बैठकीत करत आहेत आणि लेखी सादर केलेले निवेदन हे गंभीरपणे घ्यावे ही विनंती

५) श्री अजितराव पाटील चिखलीकर, जिल्हा -साताराः-

मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सदस्य होतो. आपण इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेसमध्ये जनसुनावणीची जाहिरात प्रसिध्द केलेली होती. आता कळंबे गावात कोण इंग्रजी पेपर वाचणार? तसेच मराठी वृत्तपत्र पुढारी येथे कमी प्रमाणात वाचले जाते. परिसरातील ग्रामपंचायतीस नोटीस पाठवून ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश देणे ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कृती करणे योग्य होते. उपस्थितांनी पर्यावण, पुनर्वसनबाबत बरेच मुद्दे मांडलेले आहेत. तर याठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सहभाग कसा आला अशी विचारणा केली.

त्यावेळी श्री. प्रशांत गायकवाडप्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व सुधारित २००९ नुसार विशिष्ट प्रकल्पांना प्रकल्प कार्यान्वित करण्यापूर्वी पर्यावरण अनुमती प्राप्त करणे बंधनकारक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक असून प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पासाठीचा अर्ज हा पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. येथे त्यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय येथे सादर करावा लागतो. तेथे त्या अर्जाची छाननी होते. नंतर प्रकल्प प्रवर्तकांना टीओआर प्रदान केला जातो. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक हे नाबेट मान्यता प्राप्त संस्थेकडून प्रकल्प परिसराच्या १० कि.मी परिघाचे सर्वेक्षण करुन प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करतात. ते केल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तकांना अर्ज सादर करावा लागतो. त्या अधिसूचनेनुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आयोजित करते. सदरहू अधिसूचनेनुसार जिल्हादंडाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी याच्या अध्यक्षतेखाली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ गठित करते. त्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी हे सदस्य तर त्या विभागाचे स्थानिक उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे समन्वयक असतात.

श्री. प्रशांत गायकवाड, प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आवाहन केली की बैठकीत जर आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी मुद्देसुद पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप नोंदविले, तर

त्याचा योग्यरित्या अंतर्भाव हा बैठकीच्या इतिवृतात करण्यात येईल व तो केंद्र सरकारला सादर करण्यात येईल. येथील उपस्थितांच्या भावना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस कळल्या आहेत. त्या सर्वजण योग्य प्रकारे मांडा. ही समिती प्रकल्प मंजूर करत नाही, नाकारत नाही किंवा शिफारस करत नाही. प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या पर्यावरणीय भावना शासनास सादर करणे हे या समितीचे कार्य आहे. प्रकल्पाचा योग्य तो निर्णय हा केंद्र सरकार किंवा राज्य शासनातील पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समिती घेत असते. ही समिती केंद्र सरकार किवा राज्य सरकार आणि जनता यांचा समन्वयक म्हणून काम करते.

श्री अजित पाटील यांनी पुढे विचारणा केली की -येथे श्री प्रशांत पवार, सातारा जिल्हा धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त संघटना - श्रमिक मुक्ती दल यांनी येथे मुद्दा उपस्थित केला की आम्ही मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. तर येथे इतर विभागाचे अधिकारी वनविभाग, पाटबंधारे विभागास बैठकीस बोलावणे उचित होते. ही गंभीर त्रुटी आहे. यात दुरुस्ती व्हावी.

प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व सुधारित २००९ नुसारच पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करणे बंधनकारक आहे. आपण केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री अजित पाटील यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की हा परिसर अतिशय पर्यटनासाठी सुंदर आहे. मात्र हिमाचल प्रदेशात टिहरी धरणामुळे पुर येऊन जसे वस्त्याच्या वस्त्या वाहून गेल्या, तशी येथे परिस्थिती येऊ नये. येथे ताराळी धरणाने बाधित झालेले प्रकल्पग्रस्त रस्त्यावर आहेत. उरमोडी धरणाने बाधित झालेले प्रकल्पग्रस्त रस्त्यावर आहेत. आम्हांला हक्काचे पाणी मिळत नाही. हा नैसर्गिक परिसर स्विझर्लंडपेक्षा महत्वाचा आहे. येथील सर्व शेतकरी रक्त सांडेपर्यत या प्रकल्पास विरोध करणार. येथे आम्ही स्थानिकांचे प्रतिनिधी म्हणून बोलत असून सर्व समाज या प्रकल्पाच्या विरुध्द आहे. आता येथे प्यायला पाणी मिळत नाही. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की विरोध दर्शवा, सर्व उपस्थितांनी हात वर करुन विरोध दर्शविलेला आहे.

६) श्री सुशांत मोरे, सामाजीक कार्यकर्ता, माहिती अधिकार कार्यकर्ता सातारा -

सह्याद्री पर्वतरागांवर पाच पैकी तीन प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाने २०२२ साली मंजूरी दिली. त्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील पाडगाव धरण, साता-यातील ताराळी धरण आणि पुण्यातील वरसगाव धरण. कोल्हापूरला एकी झाल्याने वनविभागाने तो प्रकल्प हाती घेतलेला नाही. येथे आपण एकजुटीने आलेलो आहोत. आम्ही लेखी तक्रारी, हरकती नोंदविलेल्या आहेत. मूळ मुद्दा असा आहे की वन खात्याचे पत्र ईआयए अहवालात नाही, वन अधिकारी येथे उपस्थित नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम योग्य प्रकारे विचारात घेतलेला नाही. येथे जैविक विविधता भरपूर प्रमाणात असून या प्रकल्पामुळे ते नष्ट होतील. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होणार आहे. परिसरातील माकडाच्या लंगूर जातीची संख्या नमुद केलेली नाही. बारा प्रकारची झाडे नष्ट होणार याचा कुठेही उल्लेख नाही. एमईआरसीचे परवानगीचे पत्र उपलब्ध केलेले नाही. येथे खालील कायद्यांचे उल्लंघन केलेले आहे.

अ) पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६,

ब) वनेजीव संरक्षण कायदा, १९७२
क) भूमी अधिग्रहण कायदा, २०१३
ड) पुनर्वसन कायदा, २०१३
पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पान क्रं, ३,४ आणि ५,९ आणि ३७,३८, ३९ . त्याचप्रमाणे शेतक-यांच्या हरकतीची नोंद घेण्यात यावी. हरकतींना लेखी उत्तर देण्यात यावे. बैठकीच्या इतिवृताची प्रत मिळावी.

७) एडव्होकेट आत्माराम कांबळे, कळंबे गावातर्फेः-

सर्वांचे स्वागत. पहिला हरकत सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधीकडून तोंडावर बोट का ठेवले जात आहे? या प्रकल्पात खालील पाणी वर नेताना जी डोंगराची पोखरण होणार आहे, तर आमची भिती आणखी वाढणार आहे. आमच्या गावच्या लोकांनी सात हेक्टर जमिन गगनगिरी महाराज ट्रस्टला दिलेली होती. २०१९ पासून आम्ही विनंती करत आहोत की येथे भूसख्लन होत असल्याने त्यांनी उर्वरित जमिन आम्हांला द्यावी. त्यांनी सांगितले की परवानगी ही जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावी. येथे जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तर आम्ही येथे सांगतो की

ही प्रकल्प होवो अथवा न होवो, ज्या जागेत प्रकल्पाविषयी जनसुनावणी सुरु आहे, त्या जागेत पावसाळ्यापुर्वीच आम्ही जाणार आहोत आणि पुनर्वसन करणार आहोत. जर भूस्खलन झाले तर आम्ही कोणीही जीवंत राहणार नाही. कारण ही जरी पर्यावरणविषयक जनसुनावणी असली तरी आमचा जीवनमरणाचा प्रश्न आहे. आमची गायरान जमिनसुध्दा घेण्यात आलेली आहे. आम्ही गायरान जमिन देणार नाही असे सांगितले होते. तसा ग्रामसभेत ठरावसुध्दा घेतलेला होता. नंतर लघुपाटबंधारे विभागात गेलो. त्यांनी दिलेल्या पत्रानुसार ही जमीन सात एकर आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे स्थळ विचारले असता त्यांनी दाखविला, तर आमच्या पाझर तलावाचा २/३ क्षेत्र हे प्रकल्पात जाणार आहे. १/३ गावाला राहिल. या प्रकल्पामुळे सर्व कळंबे गाव हे बाधित होणार आहे. या प्रकल्पात आमचा बळी जाणार आहे. पाझर तलाव हा शेजारी आहे. ब्लास्टींगमुळे पाझर तलावास तडे जाणार आहे. अगोदर भूस्खलन, नंतर ब्लास्टींग, पाझर तलावास तडे, शेवटी आम्हांला येथे येण्याशिवाय पर्याय नाही. याची नोंद घेण्यात यावी. पाझर तलावास तडे हे जाणारच आहेत, त्याशिवाय ब्लास्टींगमुळे आधीच होणार भूस्खलन मोठ्या प्रमाणात होईल. येथे मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी तेथे आता भेट व पाहणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. या प्रकल्पात मिथेन आणि कार्बन वापरला जाण्याची भिती लोकांना वाटते. खरे की खोटे हे आम्हांला माहित नाही, पण हा प्रश्न उत्तरित होणे गरजेचे आहे. हा प्रकल्प सह्याद्री व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात येत असताना परवानगी मिळालीच कशी? कळंबे गावाचा पाणीपुरवठा हा संपूर्ण पाझर तलावावर अवलंबून आहे. संपूर्ण धरण परिसराचा विचार केल्यास २/३ प्रकल्पास जाणार व १/३ परिसर स्थानिकांना मिळणार. म्हणजे आम्ही भूमीपुत्र आहोत की नाही हे आम्हांलाच कळत नाही. या प्रकल्पाबाबत पाळली गेलेली गुप्तता त्यामुळे लोकांच्या मनात असणारी भीती दूर करण्यासाठी व पारदर्शकतेसाठी शासन काय पावले उचलणार आहे? या प्रकल्पाच्या ईआयए अहवालात शाळेचाच उल्लेख नाही. कळंबे गावाच्या पाणीपुरवठ्यावर, जलस्त्रोतावर या प्रकल्पाचा परिणाम होणार आहे. तोसुध्दा बंद होणार आहे. सर्व झरे, पाण्याचे स्त्रोत नष्ट होतील, धरणाच्या भिंतीत जातील. डोंगवरुन येणारे पाणी प्रकल्पाच्या धरणातच जाणार आहे, आमचे धरण ओस पडणार आहे. धरणातील पाणीसुध्दा आटणार आहे. शेतीला पाणी मिळणार नाही, खालील गावातील शेतकरी हवालदिल होणार आहे. सदरहू प्रकल्पाच्या बांधकामाच्यावेळी सिमेंट, वाळू यामुळे पाझर तलावाचे पाणी हे दुषित होणार आहे. गावाला याच पाझर

तलावातून पाणी मिळत असल्याने त्या दुषित पाण्यामुळे लोकांच्या आरोग्याच्या धोका वाढणार आहेत. प्रकल्प बांधकाम टप्प्यात येथे राहणा-या कामगार वसाहतीतील सांडपाणी हे पाझर तलावात मिसळल्यामुळे प्रश्न गंभीर होऊ शकतो, गावाच्या आरोग्याला धोका होणार आहे.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात रस्त्यावरुन अवजड वाहने, अवजड सयंत्रणा यामुळे रस्ते खचून गावात पूर येण्याची शक्यता आहे. कळंबे गावाचे बाधित क्षेत्र किती, सरकारी क्षेत्र व गावाचे क्षेत्र किती याबाबत गुप्तता पाळण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या बांधकाम टट्प्प्यात ब्लास्टींगमुळे गावाजवळच्या डोंगराचे भूस्खलन होणार आहे. शेतात पडलेल्या भेगा आणखी मोठ्या होणार आहेत. खालच्या जलाशयातून पाणी वरच्या जलाशयात नेताना खालच्या शेतीचे किती संभाव्य नुकसान होईल याचा काहीही अभ्यास अहवालात नाही. या प्रकल्पामुळे कळंबे गावाला धोका असल्याने गावाचे पुनर्वसन हे तातडीने झाले पाहिजे. हा प्रकल्प होवो अथवा न होवो, २०१९ पासून आम्ही पुनर्वसनासाठी पाठपुरावा करत आहोत. या गगनगिरी महाराज संस्थांचा सात एकराचा जो भूखंड आहे, जर ट्रस्टने जिल्हाधिकारी यांची परवानगी आणण्याची सूचना केलेली आहे, तर जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की लवकरात लवकर जिल्हाधिकारी यांनी आमची भेट घ्यावी, भूस्खलनात गाडण्यापूर्वीच आमची भेट घ्या, कारण हा आमचा जीवनमरणाचा प्रश्न आहे. या बाबत लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांचे याबाबत तोंडावर बोटच आहे. आमच्या या हरकती असून त्यांची नोंद घेण्यात यावी. या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

८) श्री देवराज दादा पाटील (दादा), कराड समितीचे माजी अध्यक्षः-

ताराळे खोरेपासून ठोसेघरपर्यत ९० गावे आहेत. त्यांच्यातर्फे भूमिका- बैठकीस आलेल्या सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी आणि विरोध करणारे सर्व सन्माननीय ग्रामस्थ, उब्रज पासून ताराळे पर्यत सर्व अभ्यासकांनी या प्रकल्पाविषयी आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. ताराळे धरण हे ५.८५ टीएमसीचे आहे. वाटपाप्रमाणे ४.० टीएमसी हे दुष्काळी भागाला वाटप झालेले आहे. १.८५ टीएमसी पाणी हे पाटण, सातारा, कराड भागाला होतो. या प्रकल्पाच्या सर्वेक्षणात असे सांगण्यात आले नाही की कोयना जलाशयात जेवढा पाऊस पडतो, तेवढाच पाऊस येथेही पडतो. आता सादरीकरणात सांगण्यात आले की या प्रकल्पात बोगदे, ब्लास्टींग आहे. त्यामुळे ताराळी धरणाच्या भिंतीला धोका निर्माण होईल. गेल्या दोन वर्षांपूर्वी अतिवृष्टी झाली. संपूर्ण ताराळे खोरे ते उंब्रजपर्यंत भाग पाण्याखाली

होता. जर येथे अतिवृष्टी झाली, तर या परिसराता माळीणसारखा प्रसंग होण्यास वेळ लागणार नाही. परिसरातील सजीव सृष्टी नष्ट करणारा या प्रकल्पास आमचा तीव्र विरोध आहे. मानवी जीव, वन्यजीव, पर्यावरणाचा -हास, हजारो झाडांची कत्तल होणार आहे. याठिकाणी आमचा तीव्र विरोध आहे याची नोंद घेण्यात यावी. ताराळे खोरे ते उब्रज पर्यंतच्या सर्व ग्रामपंचायती, सामाजीक कार्यकर्ते, विविध संस्था यांनी आपल्या हरकती, आक्षेप नोंदविलेल्या आहेत. बैठकीचे इतिवृत् केंद्र सरकारला सादर इंग्रजीत करण्यात येईल. तर सादर करण्यात आलेल्या हरकती, आक्षेप यांचे इंग्रजीत भाषांतर करुन जो अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात येईल, त्याची एक प्रत आम्हांला उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती करण्यात येत आहे. हा विनाशकारी प्रकल्प या परिसरात नको. या ताराळी धरणासाठी ज्यांनी जमिनी दिल्या, त्या प्रकल्प बाधितांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. आजही येथील शेतक-यांना शेतीसाठी पाणी मिळत नाही. या प्रकल्पामुळे येथील जी मूळ गावे आहेत, त्यांचे माळीण झाल्याशिवाय राहणार नाही. तरी या प्रकल्पास आमचा तीव्र विरोध दर्शवित आहोत.

९) एडव्होकेट चेतन कणसे, राहणार-ताराळे, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा:-

माझा पहिला आक्षेप या जनसुनावणीसच आहे. ही जनसुनावणी ही वैध (Legal) आहे की अवैध (Illegal). जनसुनावणी प्रक्रियेबाबत जाहिर नोटीस महाराष्ट् प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी स्थानीक वृत्तपत्र पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस प्रकाशित केलेली होती. किती हरकती प्राप्त झाल्या याचा खुलासा येथे देणे आवश्यक होते. ते करण्यात आलेले नाही, म्हणून माझे जनसुनावणी बैठक आयोजनास आक्षेप आहे. तरी जनसुनावणी प्रक्रिया ही रद्द करण्यात यावी. येथे आता प्रकल्पाविषयी मी काहीही बोलणार नाही. कारण येथे ब-याच लोकांनी त्याबाबत विविध मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या जनसुनावणीस legality काय आहे? तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ज्या अधिसूचित शासकीय कार्यालयात हरकती प्राप्त झाल्या, त्या येथे आणल्या आहेत काय? त्याचे उत्तर द्यावे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ आणि सुधारित २००९ नुसार जनसुनावणीबाबत निर्देश पाळण्यात आलेले नाहीत.

श्री कणसे यांनी उपस्थितांना आवाहन केले की या प्रकल्पाचे परत मुल्यांकन (Assessment) होणे गरजेचे आहे. मुल्यांकन (Assessment) करताना स्थानिकांचा सहभाग घेण्यात यावा. तरी माझा पहिला आक्षेप आहे की ही जनसुनावणी हीच मूळात अवैध आहे. तरी ही रद्द करण्यात यावी आणि याचा अहवाल पाठवू नये.

१०) एडव्होकेट सिध्देश पवारः-

या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत मंचावर बसलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचा या जनसुनावणीत काय सहभाग होता?

माझा पहिला आक्षेप आहे की जे सादरीकरण दर्शविण्यात आले, ते उपस्थितांना दिसतच नव्हते. कोणाताही डायग्रॅम, इमेज, वाक्य योग्यप्रकारे पडद्यावर व्यवस्थित दिसले नाही. तसेच प्रकल्पाविषयी माहिती उपस्थितांना कळलीच नाही.

या अहवालात जमिन, पाणी, हवा गुणवत्तेबाबत चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. कोणीत आधारभूत संकल्पना मांडली, याचा उल्लेख नाही.

प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार यांनी जो अहवाल तयार करताना जो डेटा संकलीत केला, तो आपल्या पुढे मांडला, तर हा डेटा संकलित केला, तो कोठून केला, कोणत्या बाबींचा अभ्यास केला, याबाबत संदर्भ व अधिकृत्त दुवे या अहवालात नमुद केलेले नाहीत. या प्रकल्पाबाबत स्त्रर्वेक्षण करताना प्रकल्प बाधित गावातील किती स्थानिक संस्था, परिसरातील अभ्यासक यांच्याकडून मार्गदर्शन घेणे/संबंधितांना प्रकल्प स्त्रर्वेक्षणात सामील करुन घेतले याचा उल्लेख नाही. सर्वेक्षण करताना स्थळ पाहणी त्या त्या जागेवर जाऊन केलीच नाही, हा अहवाल हा टेबलवर, कार्यालयात तयार केलेला आहे. हा प्रकल्प इंटननेटवरुन आणलेला आहे, येथील इमेजेस् अहवालात टाकण्यात आलेल्या आहेत. कुठलेही संकलन हे अधिकृत नाही. तसेच कुठलेही अधिकृत संदर्भ दिसत नाहीत.

माझा पुढचा आक्षेप आहे की या प्रकल्पाचे सादरीकरण असे जाणूनबूजन करण्यात आलेले आहे की ते सामान्य माणसाला कळणार नाही. सादरीकरणच चुकीचे आहे.बाधित क्षेत्रात किती वनराई नष्ट होणार, किती वन्यप्राणी, पाळीव प्राणी बाधित होणार, याचा कोठेही उल्लेख नाही. अदानी समुहाने तयार केलेले अपेक्षित प्रभाव व शमन उपाय यामध्ये कुठला उपाय दिसला हे उपस्थितांनी सांगावे. प्रकल्पाचे परिणाम सांगताना त्यावर उपाय सांगितलेले नाहीत. बाधित क्षेत्रात प्रकल्पामुळे जे नुकसान होणार आहे, त्यावर उपाय नसल्याने ते त्यांनी दर्शविलेले नाहीत. या प्रकल्पाच्या ईआयए अहवाल अत्यंत त्रोटक असुन त्यामध्ये कुठलीही वस्तूस्थिती दाखविलेली नाही. अहवाला सप्टेंबर, २०२३ मध्ये पाहणी केल्याचे नमूद आहे. प्रकल्प सादर करण्यापूर्वी तीन क्रुतुंमध्ये सर्वेक्षण करणे आवश्यक होते. येथील पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतांचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

सर्वेक्षण करताना लोकांच्या जमिनीवर गेलात व अहवाल तयार केला, व्यक्तीच्या खाजगी मालमत्तेमध्ये गेलात, पाहणी केली, अहवाल तयार केला, त्यावेळी किती लोकांना विश्वासात घेतले. प्रकल्प प्रवर्तकांनी सर्वेक्षण करण्यापूर्वी किती ग्रामपंचायतींची पूर्व परवानगी घेतली? खाजगी मालमत्तते जाऊन पाहणी करता हे अवेध आहे. हा त्रोटक अहवाल असून या अहवालावर जनसुनावणी ही होऊ शकत नाही. तरी मागणीनुसार परत वर्षभर सर्व क्रुतुंचे सर्वेक्षण करण्यात येऊन अहवाल तयार करण्यात यावा, नंतर जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी. तोपर्यत ही जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी

११) एडव्होकेट सौरभ देशपांडे, एक तटस्थ अभ्यासक

एक तटस्थ अभ्यासक म्हणून मी दोन मुद्दे निदर्शनास आणू इच्छितो. मी गेले १५ वर्षे पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या क्षेत्रात काम करत आहे. येते वन खात्याचे मानद वन रक्षक श्री रोहन भाटे आलेले होते. त्यांनी व उपस्थितांनी मांडलेले पर्यावरणीय मुद्दे हे अक्षरशः खरे आहेत. कंपनीच ईआयए अहवाल तयार करणारी कंपनी ही हरियाणातील आहे. त्यांनी येथे येऊन काय सर्वेक्षण केले? तोअहवाल सदोष आहे. पानापानावर त्रुटी आहेत, शास्त्रीय पध्दतीनेसुध्दा त्रुटी आहेत.
दुसरी गोष्ट ताराळी प्रकल्प हा पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी आहे. हा प्रकल्प हा खाजगी कंपनीचा आहे. सुप्रीम कोर्टाचा स्पष्ट आदेश आहे की पाणी, जंगल, नैसर्गिक साधने याचे खाजगीकरण होऊ नये. सदरहा प्रकल्प हा त्याचे उल्लंघन करत आहे. नैसर्गिक संसाधनांचे कोणत्याही परिस्थितीत खाजगीकरण होता कामा नये. हे सार्वजनिक मालकीचे आहे.

१२) श्री जयवंतराव साळुंखे चोरेकर -

माझ्या गावाच्या पश्चिमेला साखरवाडी म्हणून गांव आहे. भगतवाडी हे गाव आहे. ते वनखात्याचे १-१ १/२ कि.मी. क्षेत्र आहे. कित्येक पिढ्या गेल्या, आजपर्यत तेथे डांबरीकरण केलेले नाही. साखरवाडीत रस्त्याचे खडीकरण झाले, कायमचा रस्ता करण्यास बंदी आहे. अधिका-यांकडे अनेक वेळा पाठपुरावा केला, आमची दखल घेतली जात नाही. प्राण्यांकडून आमचे अतोनात नुकसान होत आहे. मात्र या प्रकल्पास सर्व परवानग्या कशा मिळतात? यापाठीमागचे गमक आपण सर्वांनी ओळखले पाहिजे. ग्रामस्थांना परवानगी देताना वर्षानूवर्षे प्रयत्न करावे लागतात, मात्र ही विनाशकारी

प्रकल्प पाटण तालुक्यातील जनतेस कसा आहे हे कळत नाही. या प्रकल्पास वीज निर्मिती असे गोड नाव दिलेले असले, तरी याच्या मागे खूप मोठे कांड रचले जाते. या आपल्या परिसराचे जागतीक विभागाकडून उत्खनन केले गेले, तर असे निदर्शनास आलेले आहे की येथे असंख्य प्रकारची गौण खनिजे आहेत. त्यात अल्युमिनियम, बॉक्साईड प्रचंड प्रमाणात आहे. वीजनिर्मीतीच्या नावाखाली जमिनीचे उत्खनन करण्याचे मोठे कांड आहे.

सादरीकरणात सांगितले की सीएसआरसाठी दहा कोटी निधीची तरतुद करण्यात येईल. तर सर्व जनतेतर्फे सांगण्यात येते की प्रकल्प प्रवर्तकांनी किती पैसे हवेत ते त्यांनी सांगावे, ते आम्ही देऊ, पण येथे त्यांनी येऊ नये. ज्यांनी येथील प्रकल्पासाठी आपल्या जमिनी, घरदारे दिली, त्यांचे अजूनही पुनर्वसन केलेले नाही. स्थानिकाना प्रकल्पात नोकरीचे आश्वासन दिलेले होते, ते देण्यात आलेले नाही. शासकीय खर्चाने आरोग्यसेवा पुरविण्याचे आश्वासन देण्यात आले, तेही पुर्ण झालेले नाही. आम्हाला एकच माहित आहे § ही जमीन माझी, गाव माझे, पर्यावरण माझे, तर प्रकल्प प्रवर्तकांनी येथे येऊ नये. आमचा सर्वांचा प्रकल्पास तीव्र विरोध आहे. त्यांनी सर्व उपस्थितांना प्रकल्पास सर्वांचा विरोध आहे का त्यांनी हात वर करावे असे आवाहन केले. सर्व उपस्थितांनी आवाजी मतदानाने होकार देत हात वर केले.

१३) श्री बाळासाहेब नारायणराव जाधव, राहणार-कळंबे, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा:- स्थानिक माणसांना प्रकल्पाच्या त्रासाची झळ असते. येथे अतिवृष्टी झाली. खाली कडा, वर सडा मध्ये पट्टा. जमिन सरकली, बारा फूट शेत खाली गेलेले आहे. गरीबाला किंमत नाही. तर सर्वांनी एकत्र व्हा. बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे येथे एक दिवस माळीण होणार आहे. येथे खूप स्थानिक उपस्थितांनी आपले विचार मांडले. ५० फुटांचे तीन तडे झाले व जमिन खचली. गावातील अकरा घरे तुटली, जमिन सरकली. ही प्रकल्प वीज निर्मितीचे नांव आहे. हा प्रकल्प येथे नको. पूर्वी येथे बारमाही पाणी मिळत असे, आता प्यायला पाणी नाही. जमिन खचून घर खाली गेले. प्रकल्प ब्लास्टींगमुळे घराचे अजून नुकसान होईल. या प्रकल्पास आमचा विरोध आहे, आम्ही आमचे रक्त सांडू, पण हा प्रकल्प येथे होऊ देणार नाही.

यानंतर, श्री बाळासाहेब सपकाळ, राहणार-सावरगाव यानी उपस्थितांना सांगितले की येथे आपल्याला दोन ठराव घ्यायचे आहेत.

ह्या सह्याद्रीच्या खो-यात अनेक प्रकल्प आले, अनेक आमिषे, आश्वासने देण्यात आली. पण प्रकल्पग्रस्त म्हणून नेहमीच वाट्याला कायमचे दुःख आणि पीडा आली. येथील कष्टकरी माणसाने आपला घाम गाळून, रक्त आटवून नैसर्गिक शेती उभी केली. पण अशा विनाशकारी प्रकल्पामुळे येथील माणूस देशोधडीला लागला. तरी येथे फक्त आणि फक्त पर्यटन सोडून इतर कोणत्याही प्रकल्पास आमचा विरोध आहे.

ठराव क्रमांक १ -

हा प्रकल्प आम्हांला नको, आणि हा प्रकल्प आम्हांला कायमचा हद्दपार करायचा आहे. १००% ताराळी खो-यातून हा प्रकल्प हद्दपार झाला पाहिजे.

सर्व उपस्थितांनी हात वर करुन आवाजी मतदानाने सहमती दर्शविली.

ठराव क्रमांक २ -

प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी हीच मुळात अवैध असून ती आम्ही स्थानिक लोक ग्राह्य धरत नाही. तरी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया रद्दबादल करावी.

सर्व उपस्थितांनी हात वर करुन आवाजी मतदानाने सहमती दर्शविली.

श्री अजित पाटील, माजी सदस्य, मप्रनि मंडळ यांनी अदानी हटाव म्हणून घोषणा केली, त्यास सर्व उपस्थितांनी ताराळी बचावो अशी घोषणा दिल्या. त्यांनी घोषणा दिल्या करेंगे या मरेंगे, लढेंगे और जितेंगे अशा घोषणा दिल्या.

आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. सदरहू इतिवृत्त त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले .

उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ सातारा या कार्यालयाकडे जनसुनावनीच्या तारखेपर्यंत तसेच जनसुनावनी दरम्यान एकूण असे ४९० लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत. सर्व प्राप्त झालेले लेखी सूचना/आक्षेप हे पान क्र. १ ते १४१५ पर्यंत सोबत जोडलेले आहेत.

Amol Satpute

**(अमोल सातपुते)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,सातारा

**(प्रशांत गायकवाड)**
प्रतिनिधी, सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी-पुणे
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

**(नागेश पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा - सातारा